महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ५१ वे | दिनांक : ११/०२/२०२६ | वार : बुधवार

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय; टास्क फोर्सची स्थापना






**मुंबई :** राज्यातील शेतकरी आत्महत्या ही गंभीर सामाजिक समस्या लक्षात घेऊन कृषी विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष 'टास्क फोर्स' उभारण्याची घोषणा कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी परिपत्रकाद्वारे केली आहे. या कृती दलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यासोबतच सामाजिक, आर्थिक आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या संकटांवर एकत्रित उपाययोजना राबविण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. अशा प्रकारचे कृती दल स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

या कृती दलाचे नेतृत्व विस्तार व प्रशिक्षण विभागाचे संचालक रफिक नाईकवाडी करणार आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली सुनील बोरकर, उदय देशमुख, गणेश घोरपडे, जीवन बुंदे, नंदकिशोर नाईनवाड, सत्यजित शितोळे आणि सोनाली शिळकर या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या दलात केवळ प्रशासकीय अधिकारीच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर काम करणाऱ्या तज्ज्ञांनाही स्थान देण्यात आले आहे.

'शिवार फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर संशोधन करणारे कृषी समाजशास्त्रज्ञ डॉ. विनायक हेगाणा आणि महिला शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर अभ्यास करणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञ सृष्टी डोईजड यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे या कृती दलाच्या कामात मानवी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे केवळ कागदी योजनांपुरते न पाहता प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन उपाययोजना करण्याचा उद्देश आहे.

राज्यात शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी विविध योजना, उपक्रम आणि कार्यक्रम सातत्याने राबवले जात आहेत. तरीही हवामान बदलामुळे वाढणाऱ्या नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान, आर्थिक ताणतणाव, सामाजिक दबाव आणि मानसिक अस्थैर्य यामुळे शेतकरी अनेक अडचणींचा सामना करत आहेत. या सर्व घटकांचा विचार करून शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि मानसिक आधार देणे आवश्यक असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

या टास्क फोर्सच्या माध्यमातून आपत्तीपूर्व, आपत्तीच्या काळात आणि आपत्तीनंतर शेतकऱ्यांना शेती, आर्थिक, सामाजिक आणि मानसिक अशा चतु:सूत्री दृष्टिकोनातून मदत केली जाणार आहे. म्हणजेच शेतकऱ्यांच्या अडचणींकडे एकात्मिक पद्धतीने पाहून त्यावर ठोस उपाययोजना केल्या जाणार आहेत. शेतकऱ्यांना नैराश्यातून बाहेर काढणे, त्यांना संकटाचा सामना करण्यासाठी सक्षम बनवणे, हा या कृती दलाचा मुख्य उद्देश आहे.

यापूर्वी 'शिवार संसद' आणि 'शिवार हेल्पलाइन-८९५५७७१११५' या उपक्रमांद्वारे सुमारे अडीच हजार शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यात यश आले आहे. या अनुभवाच्या आधारे आता धोरणात्मक पातळीवर अधिक व्यापक काम करण्याची संधी मिळाली असल्याचे डॉ. विनायक हेगाणा यांनी सांगितले. या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी शाश्वत आणि प्रभावी मॉडेल उभे करता येईल, असा त्यांचा विश्वास आहे.

कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी सांगितले की, शेतकरी आत्महत्या हा विषय केवळ आत्महत्येनंतर नुकसानभरपाई देण्यापुरता मर्यादित नाही. शेतकऱ्याला आधीपासून सक्षम बनवणे, त्याच्या उत्पन्नात वाढ करणे आणि मानसिक स्थैर्य देणे हे अधिक महत्त्वाचे आहे. कृषी विभागातील विविध योजना आणि उपक्रम यांची सांगड इतर विभागांशी घालून अधिक प्रभावी पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. कृती दलाचे अध्यक्ष रफिक नाईकवाडी यांनी सांगितले की, यापूर्वी अनेक समित्यांनी शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी अभ्यास आणि उपाययोजना सुचवल्या आहेत.

त्या सर्वांचा सखोल अभ्यास करून बदलत्या परिस्थितीनुसार नवीन उपाययोजना राबविण्यावर भर दिला जाईल. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची ही संधी आहे.

या टास्क फोर्सच्या स्थापनेमुळे शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीच्या प्रयत्नांना नवे बळ मिळणार आहे. मानसिक आरोग्य, सामाजिक परिस्थिती, आर्थिक स्थैर्य आणि हवामान बदल यांचा एकत्रित विचार करून शेतकऱ्यांसाठी ठोस आणि परिणामकारक पावले उचलली जाणार आहेत. राज्यात शेतकऱ्यांसाठी उभ्या राहत असलेल्या या नव्या यंत्रणेचा फायदा प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सुप्रिया सुळे यांच्या मुलीचा साखरपुडा निश्चित; रेवती सुळे होणार नागपूरची सून



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती सुळे हिचं लग्न निश्चित झाल्याची आनंदवार्ता समोर आली आहे. सारंग अरुण लखानी यांच्यासोबत रेवती सुळे हिचा विवाह ठरला आहे. ही माहिती सुशीलकुमार शिंदे यांच्या कन्या स्मृती शिंदे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत दिली. या बातमीमुळे राजकीय वर्तुळात आणि पवार कुटुंबाच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. रेवती सुळे आता नागपूरची सून होणार असल्याने या विवाहाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

सारंग अरुण लखानी हे नागपूरचे रहिवासी असून ते उद्योगक्षेत्राशी संबंधित प्रतिष्ठित कुटुंबातील आहेत. ते विश्वराज ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अरुण लखानी यांचे पुत्र आहेत. उद्योगविश्वातील प्रभावी कुटुंबातील वारसदार असलेल्या सारंग लखानी यांची ओळख केवळ व्यवसायापुरती मर्यादित नसून ते क्रीडा क्षेत्रातही सक्रिय आहेत. विशेषतः बॅडमिंटनमध्ये त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे.

रेवती सुळे ही सुप्रिया सुळे आणि सदानंद सुळे यांची कन्या आहे. विजय सुळे हा तिचा भाऊ आहे. रेवतीने London School of Economics या प्रतिष्ठित संस्थेतून आपले शिक्षण पूर्ण केले आहे. उच्च शिक्षण, शांत स्वभाव आणि सामाजिक जाणीव यामुळे रेवती सुळे यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. बारामती लोकसभा निवडणुकीदरम्यान तिने प्रथमच आई सुप्रिया सुळे यांच्या प्रचारात सक्रिय सहभाग घेतला होता.

या विवाहाबाबत आणखी एक महत्त्वाची चर्चा म्हणजे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या जुळवाजुळव प्रक्रियेत मध्यस्थी केल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे हा विवाह केवळ कौटुंबिक आनंदाचा प्रसंग न राहता राजकीय वर्तुळातही चर्चेचा विषय ठरला आहे. नागपूर आणि बारामती या दोन राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांना या नात्यामुळे एक वेगळा स्नेहबंध जोडला गेला आहे.

सारंग लखानी यांची क्रीडाक्षेत्रातील ओळखही उल्लेखनीय आहे. बॅडमिंटनमध्ये त्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून त्यांचा खेळाडूवृत्तीचा स्वभाव परिचित आहे. उद्योग आणि क्रीडा या दोन्ही क्षेत्रात सक्रिय असलेल्या सारंग लखानी यांची प्रोफाइल बहुआयामी असल्याचे दिसून येते. त्यामुळे या विवाहाबाबत उत्सुकता अधिक वाढली आहे. रेवती सुळे हिची शैक्षणिक पार्श्वभूमी आणि सार्वजनिक आयुष्यातील मर्यादित पण प्रभावी उपस्थिती लक्षवेधी ठरली आहे. बारामतीतील प्रचार मोहिमेदरम्यान तिने केलेला सहभाग अनेकांच्या नजरेत भरला होता. त्या अनुभवामुळे तिची राजकीय जाणीव आणि संवादकौशल्यही चर्चेत आले होते.

या विवाहाची अधिकृत घोषणा झाल्यानंतर पवार आणि लखानी कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. नागपूर आणि बारामती यांच्यात या निमित्ताने एक नवा स्नेहसंबंध निर्माण झाला आहे. या नात्यामुळे राजकीय, सामाजिक आणि वैयक्तिक स्तरावर सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ११ फेब्रुवारी २०२६


## हसत होती हरळ

वावरात उन्हाळ खर्डा देताना
हरळीच्या मानेवरून
हौताची पास जाताना
हसत होती हरळ
मरणाच्या दारात असून ही..

अन् सांगत होती
सहज संपणार नाही मी
अमृत पिऊन आले आहे..

मग धरला मी नागरं
अन्
टाकले मुळासकट उखडून तिला..

पण
मातीच्या गर्भात
जिवंत होते तिचे मुळं ..

म्हणून उगवून आली ती
अख्खे उन्हाळे पिऊन
हसत हसत
मला डिवचण्या पुन्हा..

अन्
आता मी ही घेत नाही माघार
माय-मातीच्या बळावर
हरून ही अनेकदा..

कारण मी ही राहिलो
त्या हरळीच्या सोबत
तिला उखडून टाकण्याच्या
निमित्ताने का होईना..

म्हणून
लढतोय मी
आयुष्याच्या महाभारतात
पानिपत झालं तरी..



**-ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

## लोकशाहीचा रक्षक

सच्चा पत्रकार असतो
सत्यासाठी भांडणारा
असत्याचे गुपित सदा
लेखणीतून मांडणारा. १

सच्चा पत्रकार असतो
लोकशाहीचा रक्षक
पीडितांना तारणारा
हुकूमशाहीचा भक्षक. २

खरा पत्रकार असतो
समाजाचा तारक
सत्यासाठी लढणारा
दुष्ट दुर्जनांचा मारक. ३

पत्रकार असतो खरा
लोकशाहीचा आधार
झुंडशाही पुढे कधीच
घेत नाही तो माघार. ४


पत्रकार असतो सदा
सत्याला तारणारा
लोकशाहीच्या मार्गाने
असत्याला मारणारा. ५

पत्रकार असतो जगात
पीडितांचा तारणहार
लोकशाही मूल्यांचा
सदा ठरतो पालनहार. ६



**- नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## इकरा पब्लिक स्कूलचा धमाका: ३० विद्यार्थ्यांना दहावीत ५ गुणांचे 'क्रीडा सवलत' ग्रेस मंजूर; निकालात होणार मोठी वाढ!



**जळगाव** : पुस्तकी अभ्यासासोबतच मैदानावरची जिद्द काय चमत्कार घडवू शकते, याचे ज्वलंत उदाहरण इकरा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घालून दिले आहे.शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये शाळेच्या तब्बल ३० शिलेदारांनी आपल्या खेळाच्या जोरावर चक्क एस.एस.सी बोर्डाची ५ गुणांची 'बोनस लॉटरी' जिंकली आहे.केवळ वर्गात बसून नाही, तर उन्हातान्हात मैदानावर सेपक टकरा, टेनीकॉईट, कॅरम आणि ॲथलेटिक्स या खेळांमध्ये घाम गाळणाऱ्या या ३० खेळाडूंना क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडून प्रत्येकी ५ सवलतीचे गुण मंजूर झाले आहेत. दहावीच्या निकालात हे ५ गुण म्हणजे एखाद्या विद्यार्थ्यासाठी 'गेम-चेंजर' ठरणार असून, यामुळे अनेकांची टक्केवारी उंचावणार आहे. साधारणपणे एकूण टक्केवारीत १ टक्क्याची वाढ या गुणांमुळे होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.या यशाची स्क्रिप्ट लिहिली आहे शाळेचे फिजिकल डायरेक्टर मिस्टर अमीर खान यांनी! त्यांनी केवळ शिट्टी वाजवून खेळाडू तयार केले नाहीत,तर विद्यार्थ्यांमध्ये विजयाची भूक निर्माण केली.खेळाच्या तांत्रिक कौशल्यापासून ते शासनाच्या 'स्पोर्ट्स ग्रेस मार्क्स'च्या किचकट प्रक्रियेपर्यंत त्यांनी घेतलेल्या मेहनतीचे आज चीज झाले आहे. इकरा परिवाराचे प्रमुख अध्यक्ष डॉ. अब.करीम सालार, सरचिटणीस एजाज मलिक आणि मुख्याध्यापक शेख शकील यांनी या यशाचे जल्लोषात स्वागत केले आहे."आमचे विद्यार्थी केवळ उत्तरपत्रिकेवरच नाही, तर जीवनाच्या मैदानावरही चॅम्पियन आहेत," अशा शब्दांत मान्यवरांनी खेळाडूंचे कौतुक केले. एकाच शाळेतील ३० विद्यार्थ्यांना अशा प्रकारे ग्रेस मार्क्स मिळण्याची ही एक मोठी आणि दुर्मिळ घटना मानली जात आहे.

## प्रा. वैभव घनशाम कुटे याना पीएच.डी. पदवी प्रदान



**बुलढाना (जिल्हा प्रतिनिधी- महेश मुंढे)** : प्रा. वैभव घनशाम कुटे रा. हिवरखेड पूर्णा ता. सिंदखेड राजा यांनी "फॉर्म्युलेशन, ऑप्टिमायझेशन अँड इव्हॅल्युएशन ऑफ पुअरली सोलुबल ड्रग बाय एनहान्सिंग इट्स बायोअवेलेबिलिटी" या विषयावर संशोधन करून पीएच.डी. पदवी मिळवली आहे. त्यांनी ही पदवी सनराईज विद्यापीठ, अलवर (राजस्थान) येथून 30 जानेवारी 2026 रोजी पूर्ण केली. या संशोधन कार्यासाठी त्यांना डॉ. मनमीत सिंग यांचे मार्गदर्शन लाभले. कमी विद्राव्य औषधांची जैवउपलब्धता वाढविण्यावर आधारित हे संशोधन औषधनिर्मिती क्षेत्रासाठी उपयुक्त ठरणार आहे.वैभव कुटे यांच्या या यशाबद्दल त्यांच्या परिसरातून, नातेवाईक, मित्रपरिवार व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## निधन वार्ता



**दौलताबाद (जावेद अहमद)** : अकबर खान गुलाब खान धाबेवाले राहणार दौलताबाद यांचे दि १० फेब्रुवारी मंगळवारी सकाळी दहा वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहेत्यांचे दफनविधी दुपारी दौलताबाद हाफिज सय्यद अलवादिन दरगाह येथे शाळेजवळ करण्यात आले आहेत्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002


महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ११ फेब्रुवारी २०२६


# सोशल मीडियावरील 'मेंदू प्रदूषणापासून' सावध राहा - प्रा. डॉ. लक्ष्मीकांत शिंदे







**भोकरदन :**मोरेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिर वाडी खुर्द येथे दि. २९ जानेवारी २०२६ ते ४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत यशस्वीरीत्या संपन्न झाले.शिबिराच्या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे जालना जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. विठ्ठल गाडेकर तसेच प्रा. डॉ. लक्ष्मीकांत शिंदे प्राणीशास्त्र विभाग प्रमुख जे. ई. एस. महाविद्यालय जालना तथा माजी सिमेंट सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोरेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गोवर्धन मुळक होते.यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. विठ्ठल गाडेकर म्हणाले की, शिबिरकाळात लागलेल्या चांगल्या सवयी स्वयंसेवकांनी आयुष्यभर अंगीकाराव्यात. महाविद्यालयीन जीवनात मिळणाऱ्या पारितोषिकांमुळे केवळ विद्यार्थ्यांचेच नव्हे, तर महाविद्यालय, विद्यापीठ आणि पर्यायाने महाराष्ट्राचे नाव उज्वल होते, असेही त्यांनी नमूद केले.विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्रा. डॉ. लक्ष्मीकांत शिंदे म्हणाले की, पर्यावरणीय प्रदूषणासोबतच विद्यार्थ्यांनी समाजमाध्यमांवरील प्रदूषणापासून दूर राहावे व जीवनात चांगल्या सवयी अंगीकाराव्यात.अध्यक्षीय समारोप करताना डॉ. गोवर्धन मुळक यांनी शिबिरकाळातील विद्यार्थ्यांच्या अनुभवांवर आधारित एक सुंदर कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.या समारोप समारंभास वाडी खुर्दचे सरपंच अजबराव पा. नवल यांनी उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक पवन बडोदे यांनी शिबिरकाळात विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला.कार्यक्रमास वाडी खुर्द गावातील नागरिक, ग्रामपंचायत सदस्य, मोरेश्वर महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ कविता वळवी, वाडी खुर्द गावातील प्रतिष्ठित नागरिक शिवाजी पा.दौड, गौरव शिवाजी नवल, पवन विसपुते तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. नारायण लव्हाळे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. नागेश साबळे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. भगवान सोनुने यांनी केले.

## परीक्षेला जातांना

परीक्षेला जातांना
अभ्यासाची करा उजळणी
सरांचे मार्गदर्शन
असूद्या ध्यानी

रोज किती अभ्यास करायचा
याचा असू द्या मेळ
सतत लिखाणाच्या सरावामुळे
पेपरसाठी पुरेल वेळ

यशाचे शिखर गाठण्यासाठी
एकाग्रतेने करा अभ्यास
पाठ्यपुस्तकातून शोधा उत्तरे
नको गाईडचा ध्यास

स्पर्धेत टिकण्यासाठी
अभ्यासात असूद्या सातत्य
रोज सकाळच्या वेळी
गृहपाठ करा नित्य

वळणदार अक्षर होईल
शुद्धलेखणामुळे
जेव्हा मिळतिल चांगले मार्क
तेव्हा कुठे कळे

मनात नसावी कधी
परीक्षेची भीती
आत्मविश्वास असेल तर
यश तुमच्याच हाती



**-रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# छाया त्रिभुवन यांना पुरस्कार



**छत्रपती संभाजीनगर :** अंबर भरारी, अखिल भारतीय चित्रपट महामंडळ आणि डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन आयोजित १० वा अंबरनाथ मराठी चित्रपट महोत्सव - २०२६ मध्ये अवलोकितेश्वर प्रॉडक्शन्स निर्मित 'माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट वेशभूषा (Best Costume) पुरस्कार मिळाला. हा सन्मान छाया त्रिभुवन (हनी कॉस्च्युम) यांना प्रदान करण्यात आला.डॉ. सविता भीमराव आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटातील अभ्यासपूर्ण व काल सुसंगत वेशभूषेला परीक्षकांकडून विशेष प्रशंसा मिळाली. या चित्रपटांमधून तो काळ निर्माण होणे, ते पात्र त्या पद्धतीने समोर पडद्यावर साकारली जाणे हे सगळं महत्त्वाचं असतं, त्या दृष्टीने हा पुरस्कार फार महत्त्वाचा आहे म्हणूनच हा पुरस्कार छाया त्रिभुवन यांना प्रदान करण्यात येत असल्याचे सांगितले. हा पुरस्कार यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.चित्रपटाचे निर्माता-दिग्दर्शक प्रकाश त्रिभुवन आणि सहाय्यक दिग्दर्शक- अभिनेता आदित्य कुमार हे सर्व टीमसह उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्याला विजय गोखले, अरुण नलावडे, समीर चौगुले, मानसी नाईक अशोक कुलकर्णी, प्रणव रवरणे,सचिन मोटे, महेंद्र पाटील, महेश सुभेदार, अनुराधा देशपांडे , सुनील चौधरी, राहुल चौधरी, निखिल चौधरी, कुणाल चौधरी, गुणवंत खेरोदिया, अनिल गवठेकर, प्रकाश जाधव, प्रकाश नेमकर, अतुल सिधये, आमदार डॉ बालाजी किणीकर, अमेय रानडे हे मान्यवर उपस्थितीत होते.

# "पाणपोई" कवितेचे अभ्यासक्रमातील अंतीम वर्ष



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** बालभारतीच्या जून २०१६ पासून सहावीच्या अभ्यासक्रमामध्ये इंग्रजी व हिंदी माध्यमाला समावेश असलेली पाणपोई कवितेचे हे अध्यापनातील हे शेवटचे वर्ष आहे. या कवितेचे कवी मराठवाडयाचे प्रसिध्द बालकवी अय्युब पठाण लोहगावकर हे आहे. "पाणपोई" या कवितेचे वैशिष्टये म्हणजे ही कविता चार कडव्याची असून तीच्या प्रत्येक ओळीत आठरा-आठरा अक्षरे आहेत. त्यामुळे ही कविता साहित्याच्या व्याकरणकदृष्टया अधिक गेयतापूर्ण व तालबध्द तयार झालेली आहे. म्हणून ती संपूर्ण महाराष्ट्रातल्या शाळेत प्रसिद्ध झालेली कविता आहे. जून २०२६ पासून इयत्ता सहावीला बालभारतीचा नवीन अभ्यासक्रम लागू होणार आहे. पाणपोई कवितेचा सहावीच्या अभ्यासक्रमातील हा शेवटचा वर्ष असून महाराष्ट्रातील ओळखीच्या आणि सहावीला या कवितेचे अध्यापन करणारे शिक्षक-शिक्षिकांनी कवी अय्युब पठाण यांच्याशी व्हिडीओ कॉलद्वारे संपर्क करून मुला-मुलीनी प्रत्यक्ष कवीला पाहून व कविच्या मधूर आवाजात " पाणपोई " कविता ऐकून समाधान व्यक्त केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ११ फेब्रुवारी २०२६


## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत कलाशिक्षक सलीम आतार यांचा जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक; मान्यवरांच्या हस्ते गौरव




**कन्नड :** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे यांच्या वतीने सन २०२५-२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत, कन्नड तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव येथील कला शिक्षक श्री. सलीम आतार यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांनी सादर केलेल्या 'कलेतून पर्यावरण संवर्धन' या नाविन्यपूर्ण उपक्रमाला जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला असून, त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.सलीम आतार यांनी कलेच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश अत्यंत प्रभावीपणे नवोपक्रम सादर केला . या यशाबद्दल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, जिल्हा नोडल अधिकारी डॉ. मंजुषा क्षीरसागर, प्रादेशिक विद्या प्राधिकरण चे अधिव्याख्याता श्री. पांडुरंग चव्हाण आणि अधिव्याख्याता श्री. नितीन जाधव यांच्या हस्ते सलीम आतार यांचा गौरव करण्यात आला.सलीम आतार यांच्या या यशामुळे जिल्हा परिषद प्रशाला बहिरगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप , केंद्रप्रमुख अनिता जालनापुरकर यांच्यासह शिक्षक सहकारी दिलीप महाजन, कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नूतन पवार, शाम खोसरे, श्रीमती किरण पाटील , राधेश्याम शर्मा, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसनाबाई गोरे आणि सविता कुंटे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. या यशामुळे संपूर्ण तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## विद्यार्थ्यांसाठी साहित्याची अनुभूती: कवी आयुब पठाण लोहगावकर



**चापानेर :** शालेय शिक्षणात पाठ्यपुस्तकातील कविता वाचणे हा नेहमीचा भाग असतो; मात्र त्या कवितेचा कवी स्वतः विद्यार्थ्यांशी संवाद साधतो, कविता समजावून सांगतो आणि तिच्यामागील भावार्थ उलगडतो, असा अनुभव क्वचितच मिळतो. असा आगळावेगळा व प्रेरणादायी अनुभव श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथील इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना मिळाला.मराठी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या 'पाणपोई' या कवितेचे कवी, प्रसिद्ध साहित्यिक, सेवानिवृत्त शिक्षक तसेच विविध पुस्तकांचे लेखक आयुब पठाण लोहगावकर यांनी विद्यार्थ्यांशी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून थेट संवाद साधला. ठरलेल्या वेळेनुसार आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात पठाण सरांनी 'पाणपोई' कवितेचे भावपूर्ण वाचन करून तिची पार्श्वभूमी, सामाजिक आशय आणि मानवी मूल्ये अतिशय सोप्या व ओघवत्या शब्दांत विद्यार्थ्यांसमोर मांडली.आपल्या पाठ्यपुस्तकातील कवितेचा कवी प्रत्यक्ष स्क्रीनवर दिसताच विद्यार्थी क्षणभर आश्चर्यचकित झाले. पहिल्यांदाच पाठ्यपुस्तकातील कवी स्वतः कविता शिकवत असल्याचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी अतिशय भावनिक आणि प्रेरणादायी ठरला. पठाण सरांनी कवितेतील प्रत्येक कडव्याचा अर्थ स्पष्ट करत पाणपोईसारख्या उपक्रमामागील माणुसकी, परोपकार आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवले.या संवाद सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना पठाण सरांनी समर्पक उत्तरे देत कविता लेखनामागील प्रेरणा, अनुभव आणि साहित्यनिर्मितीचा प्रवास उलगडून सांगितला. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ कविता समजली नाही, तर साहित्यिकाचा विचारविश्व आणि संवेदनशील दृष्टीकोनही अनुभवता आला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्याविषयी अधिक आपुलकी निर्माण झाली असून वाचन, लेखन आणि सर्जनशीलतेकडे वळण्याची प्रेरणा मिळाली आहे. शाळेच्या शिक्षकवर्गाने व व्यवस्थापनाने या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे अध्यापन अधिक प्रभावी व जिवंत होत असल्याचे मत व्यक्त केले.तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षण अधिक अनुभवसमृद्ध करण्याचा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या स्मरणात कायम राहणारा ठरला आहे. यावेळी संस्थेच्या वतीने अध्यक्ष दशरथ सोमसे सर, प्राचार्य कौशल्य सोमासे, उपप्राचार्य संदीप वाकडे, मराठी विभाग प्रमुख वर्षा जाधव यांनी पठाण सरांचे आभार मानले

## मुखवट्यांचा बाजार

झगमगाटाच्या पडद्यामागे
किती अंधार साठलेला असतो,
हे महालांच्या उंचीवरून कळत नाही
ते कळतं
त्यांच्या सावल्यांच्या लांबीवरून.

इथे शब्दांना सुवर्णसिंहासन,
आणि सत्याला उभं राहायलाही जागा नाही.
नीतीच्या घोषणा आकाश चिरतात,
पण कृती जमिनीला भिडताच
त्यांचा प्रतिध्वनी मरून जातो.

स्वातंत्र्याच्या नावाने मेजवानी सजते,
पण विवेकाला निमंत्रण नसतं.
मूल्यं कुजबुजेत सौद्यात निघतात,
आणि मौनालाच सन्मान मिळतो.

इतिहास कधी ओरडत नाही—
तो शांतपणे नोंद ठेवतो:
कोण मुखवट्यांत जगलं,
आणि कोण चेहऱ्याने उभं राहिलं.

पतन रणशिंग फुंकून येत नाही,
ते सवयीने येतं—
थोडं तडजोडीतून,
थोडं भीतीतून,
आणि उरलेलं
"सगळेच करतात" या समजुतीतून.

पण प्रत्येक अंधाराला
एक जागा डोळा पुरतो,
प्रत्येक खोट्याला
एक जिवंत प्रश्न पुरतो.

म्हणून आरडाओरडा नव्हे—
विवेकाचा आवाज व्हा.
ज्वाला नव्हे—
दिशा दाखवणारा प्रकाश व्हा.

कारण साम्राज्यांना
वादळं पाडत नाहीत—
त्यांना पाडतो
जागा झालेला समाज.

आणि लक्षात ठेवा—
अंधाराला भीती सूर्योदयाची नसते,
तो घाबरतो
एका न विझणाऱ्या पणतीला.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ११ फेब्रुवारी २०२६


## युवकांनी जीवनात संकटात खचून जाऊ नये, दु:ख माणसाला प्रेरणा देते




**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** युवकांनो जीवनात कितीही संकटे चढउतार येऊ द्या खचून जाऊ नका, दु:ख माणसाला प्रेरणा देते. असे प्रतिपादन जालनात जेइएस महाविद्यालयाच्या 'युवा जल्लोष' सप्ताह अंतर्गत स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात सुप्रसिद्ध मराठी सिने अभिनेत्री वैशाली दाभाडे यांनी केले.जेइएस महाविद्यालय जालना येथे युवा जल्लोष सप्ताह या कार्यक्रमांतर्गत स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी सिने अभिनेत्री वैशाली दाभाडे होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी जालना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया होते, व्यासपीठावर संस्थेचे सचिव श्री. श्रीनिवास भक्कड व उपाध्यक्ष फुलचंदजी भक्कड , प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, उपप्राचार्य डॉ .महावीर सदावर्ते पर्यवेक्षक डॉ.सुमंत बिक्कड, प्रा.ज्ञानेश्वर धनवे तसेच विद्यार्थी संसद सचिव कुमारी संस्कृती संगम व विद्यार्थी प्रतिनिधी यांची प्रमुख उपस्थिती होती . यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले शैक्षणिक वर्ष २०२ -२६ मध्ये महाविद्यालयात घेतलेल्या विविध उपक्रमांची व महाविद्यालयाने संपादित केलेले यश व शैक्षणिक क्षेत्रात घेतलेली भरारी याची इत्याभूत माहिती दिली. आज जगभर जेइएस महाविद्यालयचे विद्यार्थी मोठ्या पदावर काम करत असल्याचेही सांगून त्यांनी उद्योग, व्यवसायातही नावलौकिक कमावल्याचे प्राचार्य डॉ अग्निहोत्री यांनी सांगितले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना मराठी सिने अभिनेत्री वैशाली दाभाडे म्हणाल्या की, युवकांना जीवनात कितीही संकटे आले ,तरी खचून जाऊ नये जीवनात असे चढउतार येत असून त्याला सामोरे जावे, दु:ख माणसाला प्रेरणा देते , जगणं शिकवते यातून माणसाचं मन सभेतील घडतं, त्यांच्या चित्रपटातील अनेक प्रसंग त्यांनी यावेळी सांगितले वेगवेगळ्या भूमिका करत असताना स्त्रीला कोणत्या दु:ख वेदना सहन करावा लागतात याविषयी त्यांनी सांगितले, बालरंगभूमीवर ही मी भूमिका केल्याचे सांगून कला व संस्कृती याचा संगम बालरंगभूमीत दिसतो. साधना व तपश्चर्या यामधूनही कलावंत , अभिनेता घडत असल्याचेही वैशाली दाभाडे यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया म्हणाले की महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध असून त्याचा विद्यार्थ्यांनी फायदा घेऊन नावलौकिक कमवावा, आवडीच्या क्षेत्रामध्ये करिअर करावे असेही श्री .बगडिया यांनी सांगितले. यावेळी युवा जल्लोष चे प्रमुख प्रा डॉ. हेमंत वर्मा, प्रा. डॉ. गणेश रोकडे, प्रा मनोज मेहर, प्रा डॉ लक्ष्मीकांत शिंदे,प्रा डॉ सुखदेव मांटे, प्रा डॉ किशोर तापडिया,प्रा डॉ यशवंत सोनूने, प्रा डॉ उमेश मोगले, प्रा डॉ राजेश सरकटे, आदि, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन बावस्कर यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी मानलेत.

## परळी वैजनाथ येथील महा पशुधन एक्स्पोच्या लोगोचेमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण




**मुंबई, (भगवंत पाळवदे) :** पशुसंवर्धन विभागाच्या वतीने बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीयस्तरावरील महा पशुधन एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत झाले.मंत्रालयात मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या कार्यक्रमास मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन यांच्यासह विविध विभागचे मंत्री तसेच सचिव उपस्थित होते.पशुसंवर्धन विभाग व पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या वतीने बीडमधील परळी वैजनाथ येथील ओपळे मैदानात हे महा पशुधन एक्स्पो होणार आहे. या प्रदर्शनात देशभरातील विविध जातीवंत पशुधन पाहण्यास मिळणार आहेत. त्याशिवाय पशुवैद्यकीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन, विविध पशुसंवर्धन विषयक योजनांचे सादरीकरण, पशुपालन विषयक प्रात्यक्षिके आदींसह सुमारे विविध विषयांवरील ३०० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. याशिवाय विविध प्रकारच्या ४५ हून अधिक स्पर्धा घेण्यात येणार आहेत.या प्रदर्शनात सुमारे हजाराहून अधिक विविध पशुपालक आपल्या पशुंसह सहभागी होणार आहेत. तसेच पशुपालन विषयक क्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासक व विद्यार्थीही या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903





मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com